**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताची हवाई वाहतूक सेवा जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचल्याचं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचं प्रतिपादन
- आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरातल्या नियोजनाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी
- आगामी विधानसभेत समाजवादी पार्टी महाराष्ट्रात ३० ते ३५ जागा लढवणार असल्याची पक्षाचे राज्य कार्याध्यक्ष प्रतापराव होगाडे यांची माहिती
- मुंबईसह कोकणात पावसाची संततधार सुरूच, जनजीवन विस्कळीत / रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी

  **आणि**
- पाचव्या आणि अखेरच्या टी-ट्वेंटी सामन्यात भारताचं झिम्बाव्वेसमोर विजयासाठी १६८ धावांचं आव्हान

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात भारतातल्या हवाई वाहतूक क्षेत्रानं मोठी प्रगती केली असून, ही वाहतूकसेवा जागतिक पातळीवर तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे, असं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात बोलताना सांगितलं. पुण्याच्या लोहगाव विमानतळावर नव्यानं उभारण्यात आलेलं टर्मिनल आज मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवाशांच्या सेवेसाठी खुलं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. देशात नवीन ४६९ हवाई मार्ग सुरू झाले असून दिल्ली, बंगळुरु आणि अयोध्या विमानतळावर नवीन टर्मिनल उभी राहिली आहेत, प्रत्येक भारतीयाला अभिमान

वाटावा अशीच ही कामगिरी आहे, असं ते म्हणाले. आगामी काळात देशभरात आणखी २० ते २५ नवीन विमानतळांची उभारणी केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. नव्या टर्मिनल वरून विमान प्रवास करणाऱ्या पहिल्या प्रवाशाला यावेळी मोहोळ यांच्या हस्ते बोर्डिंग पास देण्यात आला.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पंढरपुरात आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेऊन सोई-सुविधांची पाहणी केली. वारीमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता भासू दिली जाणार नाही, वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या वर्षी पंढरपुरात स्वच्छता व्यवस्था चांगली आहे असं सांगून नदी स्वच्छता आणि वाळवंट स्वच्छतेबाबत मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या. मुख्यमंत्र्यांनी करकंब इथं श्री संत निळोबाराया पालखीचं दर्शन घेतलं आणि पालखीसोबत काही वेळ पायी प्रवास केला. यावेळी मंत्री गिरीश महाजनही सोबत होते.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी आज आपल्या मुंबई भेटीदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा बंगल्यावर सदिच्छा भेट घेतली.

या भेटीत एकमेकांना लागून असलेल्या आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र या दोन राज्यांतील परस्पर सहकार्य वाढवून दोन्ही राज्याचा विकास कसा साधता येईल याबाबत प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

यावेळी त्यांच्यासह केंद्रीय मंत्री राममोहन नायडू आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेदेखील उपस्थित होते.

<><><><><>

जनतेचा विकास आणि गरिबांना सहाय्य हाच विचार आम्ही विधानसभा निवडणुकीत राज्याच्या कानाकोपऱ्यात जाऊन सर्व जनतेला सांगणार आहोत, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केलं. बारामती इथं आयोजित ‘जन सन्मान’ रॅलीत ते आज बोलत होते. महाराष्ट्रात आबालवृद्ध किंवा माता भगिनींवर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. चांद्यापासून बांद्यापर्यंत राज्यातल्या लाडक्या बहिणींच्या खात्यात रक्षाबंधनाच्या दिवशी तीन हजार रुपये जमा होणार आहेत. तीन सिलेंडर मोफत दिले जाणार असून राज्यातल्या महिलांना सक्षम आणि आत्मनिर्भर करण्याकरता महायुतीनं ही योजना आणली आहे, असं अजित पवार म्हणाले. राज्य सरकारनं शेतकऱ्यांना मोफत वीज, एक रुपयात पीक विमा, कापूस आणि सोयाबीनला एकरी पाच हजार रुपये तर दूध उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव पाच रुपये अनुदान दिलं आहे, असं त्यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

समाजवादी पार्टी महाराष्ट्रात इंडिया आघाडीसोबत विधानसभा निवडणूक लढवणार असून ३० ते ३५ जागा लढवण्याचा पक्षाचा विचार आहे, अशी माहिती पक्षाचे राज्य कार्याध्यक्ष प्रतापराव होगाडे यांनी वार्ताहर परिषदेत दिली. तसंच, धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा विधानसभा मतदार संघावर पार्टीचा दावा राहणार असल्याचंही ते यावेळी म्हणाले. समाजवादी पार्टीच्या उत्तर प्रदेशातल्या सर्व खासदारांचा सत्कार १९ जुलै रोजी मुंबईत होईल आणि ९ ऑगस्ट रोजी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांची मालेगाव इथं सभा होणार असल्याची माहितीही होगाडे यांनी दिली.

<><><><><>

ओदिशातल्या भगवान जगन्नाथांचं रत्नभांडार उघडण्याची प्रक्रिया आज दुपारी सुरू झाली. ही संपूर्ण प्रक्रिया सरकारने आखून दिलेल्या मानकांनुसार पार पडली असून तिचं व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलं आहे. रत्नभांडारात दुर्मीळ दागिने, रत्नं, सोनं यांचा समावेश आहे. हा मौल्यवान ऐवज ठेवलेल्या पेट्या कडेकोट सुरक्षा व्यवस्था असलेल्या खोलीत तात्पुरत्या स्वरुपात ठेवल्या आहेत. या ऐवजाची मोजदाद करण्यात येईल. हे रत्नभांडार यापूर्वी १९८५ मध्ये उघडण्यात आलं होतं, तर यातल्या मौल्यवान वस्तूंची मोजदाद शेवटची १९७८ मध्ये झाली होती.

<><><><><>

राज्यात आजही अनेक भागात पावसाची संततधार सुरु आहे. मुंबई ठाण्यासह उपनगरात सकाळपासून पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या.

मुंबईत दादर आणि प्रभादेवी रेल्वे स्थानकांदरम्यान झाड पडल्यामुळं पश्चिम रेल्वेची सेवा काही काळ विस्कळीत झाली, मात्र ती लगेचच पूर्ववत झाली.

पालघर जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे अनेक नद्यांना पूर आल्याची स्थिती आहे. भिवंडीत बाजारपेठ, तीन बत्ती, कल्याण नाका या परिसरात गुडघाभर पाणी साचलं.

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झालं. जिल्ह्यातल्या उल्हास नदी, सावित्री नदी, अंबा नदी, कुंडलिका या नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली, तर अंबा नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, मरिआई मंदिर परिसर, कोळी वाडा परिसरात पुराचं पाणी शिरलं. त्यामुळे शहराला जोडणारे तिन्ही रस्ते बंद झाले. एसटी स्थानकातही पुराचे पाणी शिरल्यानं वाहतूक बाधित झाली.

जगबुडी नदीला पूर आल्यामुळे खेड शहरातल्या १७७ जणांना स्थलांतरित करण्यात आलं. अतिवृष्टीमुळे खेड आणि संगमेश्वरात अनेक भागात पाणी साचल्यानं वाहतूक ठप्प झाली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात तळवडे न्हावणकोंड धबधब्याकडे जाणाऱ्या मार्गावर दरड कोसळल्यानं हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. जिल्ह्यातली तेरेखोल आणि गड नदी इशारा पातळीवर वाहत आहे. होडावडा- कळसूली इथल्या पुलावर तसंच किर्लोस इथल्या बंधाऱ्यावर पाणी साचल्यामुळे इथली वाहतूक बंद ठेवण्यात आली.

दरम्यान हवामान विभागानं रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे.

कोल्हापूरमध्ये सतत पडत असलेल्या पावसामुळं जिल्ह्यातल्या नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली. शाहूवाडी तालुक्यात बर्की रस्त्यावर एक फुट पाणी साचल्यानं हा आल्यानं हा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला होता.

पुण्यात पिंपरी चिंचवडला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणाच्या पाणी पातळीत ३ पूर्णांक ९४ टक्क्यांची वाढ झाली आहे. पुण्यातल्या मुकुंदनगर भागात मोठं झाड, विजेच्या खांबावर कोसळल्यानं विद्युत खांब कोसळला.

**<><><><><>**

पाचव्या आणि अखेरच्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतानं झिम्बाव्वेसमोर विजयासाठी १६८ धावांचं आव्हान आव्हान ठेवलं आहे. या सामन्यात झिम्बाव्वेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर भारतानं संजू सॅमसन याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर निर्धारीत २० षटकांत ६ बाद १६७ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ९ व्या षटकात झिम्बाव्वेच्या ३ बाद ५९ धावा झाल्या होत्या. या मालिकेत भारतानं ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारातल्या गुंतवणुकीतून जास्त परतावा मिळवून देण्याचं आमिष दाखवत, शेकडो जणांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेच्या मालमत्ता विभागानं आशिष शहा या व्यक्तीला मध्यप्रदेशातून अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून १ किलो ९०० ग्रॅम सोनं आणि २५ लाखांची रोकडही जप्त केली. शहा याच्या चौकशीत त्यानं आत्तापर्यंत जवळपास ४०० ते ५०० जणांची फसवणूक केल्याचं निष्पन्न झालं अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

परभणी जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा ६ लाख २८ हजार ३५८ शेतकऱ्यांनी ४ लाख १७ हजार ५०६ हेक्टरसाठी अर्ज भरले आहेत. या योजनेअंतर्गत केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना विमा कवच दिलं जातं. हे अर्ज भरण्यासाठी उद्यापर्यंत मुदत असल्यानं जिल्ह्यातल्या ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अर्ज भरले नाहीत त्यांनी अर्ज करावेत असं आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात  बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागानं कळवली आहे. या काळात मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.